# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २६/१०/२०२४ (शनिवार) दुपार

## अवैधरीत्या महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला नायलॉन मांजा साठवुन तो नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे भिवापूरः— अंतर्गत गणेश चौक भिवापुर येथे दि. २५/१०/२०२४ रोजी **आरोपी नामे— रविंद्र पुंडलीक केदार वय ५६ वर्ष रा. गणेश चौक भिवापुर** हा आपल्या घरी चार बाय १० कवेलु रूम मध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला नायलॉन मांजा साठवुन तो नायलॉन मांजा विक्री करतो. अशा माहीतीवरून भिवापूर स्टाफ यांनी घटनास्थळी जावुन रेड कारवाई केली असता आरोपीकडुन एका पांढऱ्या रंगाचे चुंगडीमध्ये २५ नग प्रत्येकी ३५० रू प्रमाणे ८७५०/— रू व एक शेंद्री रंगाचे चुंगडीमध्ये २० नग प्रत्येकी ३५० रू प्रमाणे ७००० असा एकुण ४५ नग किंमती १५७५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी **आरोपी नामे— रविंद्र पुंडलीक केदार वय ५६ वर्ष रा. गणेश चौक भिवापुर** याचेविरूद्ध पोस्टे भिवापूर येथे कलम २२३() बीएनएस सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड श्रीमती वृष्टी जैन यांचे मार्गदर्शनात पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल व त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

## आगामी विधानसभा निवडणूक —२०२४ संबंधाने पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत रूटमार्च

पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत आज दिनांक २६/१०/२०२४ रोजीचे १६/०० ते १७/०० वा पर्यंत विधानसभा निवडणूक संबंधाने मा. उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड श्रीमती वृष्टी जैन यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल यांनी रूटमार्च घेतला. सदर रूटमार्च बस स्टॉप चौक, भीमा देवी चौक मटण मार्केट गणेश मंदिर चौक विठ्ठल मंदिर चौक, आझाद चौक, रामधन चौक, गुजरी चौक,परत पोलीस स्टेशन भिवापूर पर्यंत रूट मार्च घेण्यात आला. रूट मार्च दरम्यान पोलीस स्टेशन भिवापूर येथील ०१ अधिकारी, २० अंमलदार तसेच सशस्त्र सीमा बल चे पथक हजर होते. नागरिकांना सशस्त्र सीमा बल चे अधिकारी व कर्मचारी यांनी आगामी विधानसभा निवडणूक संबंधाने कोणत्याही प्रकारची भीती न बाळगता मतदान करण्याबाबत आव्हान करण्यात आले.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर